सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

संपादक : घनश्याम पाटील

Website :www.chaprak.com

■ पुणे ■ वर्ष : ५
■ अंक : ३६
■ पाने : ४
■ मूल्य : ₹ ३

Kamant™
कामंत मसाले
किंग ऑफ टेस्ट
एकदा वापरून पहाच!
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : मच्छिंद्र कामंत, (सी.एम.डी), तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४, हिंजेवाडी, पुणे - ४०००२७ दूरध्वनी : ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com, www.kamantmasale.com

■ सोमवार, २८ सप्टेंबर ते ०४ ऑक्टोबर २०१५ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. PCW/159/2014-2016

Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** Posted at Pune PSO on every Wednesday, date of publication 30/09/2015

*त्यानं* काही दिवसांपूर्वी सिंहगडाजवळ शेत घेतलं अन् मग एकदा त्याला एकानं विचारलं की, ''तू शेतावर काय लावतोयस रे?'' हा म्हणाला, ''लाकडं. माझी मी उगवतोय. हो! नाहीतर हे सगळे दोस्त लोक ओल्या लाकडावर जाळायचे. धूर डोळ्यात गेल्यावर यांच्या डोळ्यातून पाणी यायचं आणि जळताना भला वाटायचं की माझ्यासाठी रडतायत. असले नालायक आहेत. त्यामुळं मी माझ्यासाठी सुकी लाकडं आणणार. धूर कमी. त्यामुळं मला जळताना कळेल की खरा कोण आणि खोटा कोण? काय सांगावं, तिथेसुद्धा कदाचित मी उठेन मुस्काटीत मारायला.'' त्याचं हे उत्तर फटकळ आहे; मात्र खूप काही सांगणारं. माणूस येताना काही घेऊन येत नाही, जाताना काही घेऊन जात नाही. त्याला या गोष्टीचं पक्कं भान आहे. त्याला पक्कं माहिती आहे, माणसाच्या गरजा किती असतात, किती असाव्यात! त्याच्याकडे तरी काय होतं एकेकाळी? नववीत होता तो त्यावेळी. वय तेरा वर्षे. त्या वयात पोटासाठी नोकरी केली त्यानं. मुंबईत दादरच्या समर्थ विद्यालयात शिकायचा. दुपारी घरी यायचा माहिमला. असेल ते खायचा व नोकरीसाठी आठ किलोमीटर चालत जायचा. पुन्हा आठ किलोमीटर चालत यायचा. हातात कला होती. पेंटींग छान करायचा. नोकरी पेंटींगचीच. सिनेमाची पोस्टर्स करायचा. वय होतं का त्याचं ते नोकरी करण्याचं? मात्र पर्यायच नव्हता. वडिलांना कोणीतरी फसवलं म्हणून त्यात त्यांचं सगळंच गेलं. त्याआधी दोन वेळची भ्रांत नव्हती; मात्र आता एका वेळेचीही भ्रांत निर्माण झाली. कोवळं वय. आईवडिलांकडे हट्ट करण्याचं. खेळण्याबागडण्याचं; मात्र संकट आलं तेव्हा तो कोवळ्या वयातही डगमगला नाही. लढला सरळ! परिस्थितीशी दोन हात केले. मुख्य म्हणजे मन कटू करून घेतलं नाही स्वत:चं. त्याच्याच शब्दात सांगायचं तर जी लढण्याची ताकत मिळाली ती त्याच दिवसातून मिळाली. पुढं काय घडलं मग? हिंदी चित्रपटसृष्टीतला 'बाप माणूस' झाला तो पुढं वीस एक वर्षानंतर! भलेभले त्याच्या अभिनयाला सलाम करू लागले. आत्मविश्वास थक्क करणारा होता त्याचा! एका टप्प्यावर तर अमिताभ बच्चनपेक्षा जास्त मानधन घेत होता म्हणे तो! चिकार लोकप्रिय झाला; मात्र एक गोष्ट कधीही विसरला नाही तो. महिना पस्तीस रूपये पगार व एक वेळचं जेवण यावर केलेली नोकरी. प्रसंगी मुंबईच्या फुटपाथवर झोपून काढलेले दिवस! त्याच्या वाईट दिवसात अनेकांनी त्याला आधार दिला. विजया मेहता, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, मंगेश कुळकर्णी, मोहन तोंडवळकर, दिलीप कोल्हटकर ते अगदी अशोक सराफपर्यंत. या कुणालाही तो विसरला नाही. 'पाहिजे जातीचे', 'हमिदाबाईची कोठी', 'महासागर' ही त्याची सुरूवातीची नाटकं. मग आलं त्याचं

> *एकदा त्याला एकानं विचारलं की, ''तू शेतावर काय लावतोयस रे?'' हा म्हणाला, ''लाकडं. माझी मी उगवतोय. हो! नाहीतर हे सगळे दोस्त लोक ओल्या लाकडावर जाळायचे. धूर डोळ्यात गेल्यावर यांच्या डोळ्यातून पाणी यायचं आणि जळताना भला वाटायचं की माझ्यासाठी रडतायत. असले नालायक आहेत. त्यामुळं मी माझ्यासाठी सुकी लाकडं आणणार. धूर कमी. त्यामुळं मला जळताना कळेल की खरा कोण आणि खोटा कोण? काय सांगावं, तिथेसुद्धा कदाचित मी उठेन मुस्काटीत मारायला.'*

'पुरूष' हे नाटक. 'पुरूष' तर त्याच्यावरच बेतलेलं. खलनायकी भूमिका होती ती; मात्र आख्खं नाटक त्यानंच उचलून धरलेलं. कितीतरी चर्चेत राहिलेलं ते नाटक; मात्र त्यावेळी त्यातून तरी त्याला काय मिळत होतं? पन्नास रूपये मिळायचे एका प्रयोगाचे. त्याची बायको निलकांती. ती तेव्हा बँकेत अधिकारी होती. तिला याच्यापेक्षा जास्त पैसे मिळायचे; मात्र तिनं याची उमेद खचू दिली नाही. मुळात नाटकात तो टिकून राहिला तो तिच्याच प्रोत्साहनामुळं. हा या सगळ्यांचे ऋण मानतो. ऋणानुबंध तो विसरत नाही. आईवडिलांचे ऋणही तो विसरला नाही. वडील माळकरी. अत्यंत सज्जन! वडिलांनी एकच सांगितलं होतं, 'नाना, कधीही कोणाकडून पैसे घेऊ नकोस आणि कुणाला दिलेस तर लक्षात ठेऊ नकोस.' वडिलांचे हे शब्द. ते त्यानं आयुष्यात प्रमाण मानले. आपण समाजाला




काही देऊ ते योग्य ठिकाणी गेलं पाहिजे. फूल असो वा फुलाची पाकळी, सत्पात्री गेली पाहिजे. त्याचे ढोल वाजवायचे नाहीत. आव आणायचा नाही. कसलाही दांभिकपणा टाळायचा. या गोष्टी त्यानं लक्षात ठेवल्या. त्यानं देवाकडे दोन वेळची भाकरी मागितली होती. त्याच्या करोडो पटीनं देवानं त्याला सर्व काही दिलं ही त्याची भावना. ''माझी ओंजळ तेवढीच आहे. ती मोठी नाहीच झाली. ती भरलेलीच आहे'' तो म्हणतो. पैशांचा त्याला तिटकारा नाही; मात्र पैसा हे त्याच्यासाठी सर्वस्व कधीच नव्हतं. म्हणूनच पैशानं विकत मिळणारी सुखं. ती विकत घेण्याच्या भानगडीतच तो कधी पडला नाही. ''मला गाडी-घोड्यांची किंवा मोठ्या घराची हौस नव्हती. तू माझा मित्र आहेस. मी तुझी किंमत लावायची म्हटलं तर लावता येईल का?'' तो मित्रांना सरळ विचारतो. त्याच्या या विचारण्यात मोल माणसांचं आहे. पैशाचं नाही.

तो रमला माणसांमध्ये. त्याला माणसं प्रिय! तो बाबा आमट्यांकडे खेचला गेला तसा बाळासाहेब ठाकऱ्यांकडेही. त्यात त्याला काही विरोधाभास वाटत नाही. त्याच्या मते ही दोन्ही माणसं खूप मोठी होती. खूप निखळ होती. तो कुठल्याच जातिधर्मात अडकून पडलेला नाही. 'मुरूड-जंजिरा' हे त्याचं गाव. सहावीपर्यंत तो तिथं शिकला. रात्री बेरात्री उठून तो समुद्रावर जाऊन बसत असे. त्या समुद्रानं त्याला भेद शिकवला नाही. ''मुरूडला समोर नेहमीच समुद्र असायचा. त्यामुळं जे काही पहायचं ते भव्यच पहायचं अशी सवयच लागली'' तो सांगतो. त्याच्या मते समुद्र हा उदात्त असतो. खळखळता असतो. त्याच्याकडे पाहिल्यानंतर आपल्या मनाचा कोतेपणा गळून पडतो. १९६८ साली तो 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'मध्ये होता मुंबईच्या. त्याचं चित्रकार असणं हा केवळ योगायोग

> *वडिलांनी एकच सांगितलं होतं, 'नाना, कधीही कोणाकडून पैसे घेऊ नकोस आणि कुणाला दिलेस तर लक्षात ठेऊ नकोस.'*

नाही. त्याच्या कॅनव्हासवर त्यानं एका चांगल्या राज्याचं चित्र रेखाटलं आहे. एक नागरिक म्हणून त्याला एक बऱ्यापैकी 'सिस्टिम' हवी आहे. माणसांचं जगणं निदान सुसह्य करेल अशी सिस्टिम. दुसरीकडे आपणही या राज्याचे, या देशाचे नागरिक आहोत व आपलीही काही जबाबदारी आहे हे तो मानतो. जात, धर्म नंतर. ''मला 'कुराण'मधली खूप आयतं बोलता येतात. माझ्या गळ्यात ताईत आहे व कृष्णसुद्धा'' तो सांगतो.

नाना पाटेकर! काही माणसं घरातलीच वाटतात. तसा हा माणूस. आता पुन्हा चर्चेत आलाय तो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या! हा विषय त्यानं उचलून धरल्यामुळं. विदर्भ, मराठवाड्यात परिस्थिती भिषण! तिथं हा फिरतोय. त्याला शक्य ते सर्वकाही करतोय. मकरंद अनासपुरेही मराठवाड्यातला. त्यालाही माहीत आहे, दुष्काळ ही काय चीज असते ते! मात्र नानाची आर्थिक मदत किती जणांना पुरणार? किती काळ पुरणार? तरीही त्याचं महत्त्व मोठं आहे. माणसांची उमेद मारून टाकतो दुष्काळ. नानाच्या प्रयत्नांमुळे ही उमेद टिकून राहिल माणसांची. होणाऱ्या आत्महत्या टळू शकतात त्याच्या या कामामुळं. 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' हा व्यवस्थेपुढचाच प्रश्न नाही फक्त. तो तुम्हा आम्हा नागरिकांपुढचा देखील प्रश्न आहे. नानाचं वेगळेपण एवढंच, त्यानं हा प्रश्न आपला मानला. प्रश्न आपलेच आहेत सगळे अवतीभवती निर्माण झालेले. आपणच ते प्रत्येकवेळी राजकारण्यांवर ढकलतो का? ती एक सोय आहे का? पळवाट आहे का? आपली जबाबदारी टाळण्याची? 'राजकारणातली विश्वासार्हता संपली' हे म्हणायला ठीक आहे; मात्र आपल्या विश्वासार्हतेचं काय? हा लेख लिहिताना रात्रीचे आठ वाजतायत. नारायण पेठेतल्या ऑफिसमध्ये बसून हे लिहितो आहे. दुसऱ्या मजल्यावरच्या माझ्या ऑफिसच्या भिंती व खिडक्यांच्या काचा. थरथरतायत त्या. का? खाली गणपती विसर्जनाची मिरवणूक चालू आहे. सहज खिडकी उघडली. खाली नजर टाकली तर विशी-तिशी-चाळीशीतली जमात नाचण्यात धुंद आहे! अंगात आल्यासारखं त्यात मुलीही आहेत. एक मुलगी. नाचतेय ती! काय सिद्ध करायचं असतं या सगळ्यातून समजत नाही. हायकोर्टाचे सगळे निर्णय धाब्यावर बसवून चाललेला हा उन्माद! भयानक आहे तो! आपल्याच राज्यातल्या एका भागाला 'मराठवाडा' म्हणतात. एका भागाला 'विदर्भ' म्हणतात. तिथं मागच्या काही वर्षात तीस एक हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अजूनही आत्महत्या चालू आहेत हे या नर्तक व नृत्यांगनांच्या गावी आहे की नाही माहीत नाही.

> *एक गोष्ट कधीही विसरला नाही तो. महिना पस्तीस रूपये पगार व एक वेळचं जेवण यावर केलेली नोकरी. प्रसंगी मुंबईच्या फुटपाथवर झोपून काढलेले दिवस!*

तर वातावरण हे असं आहे. कुणाला कुणाचं पडलेलं नाही फारसं. मग नानाचं वेगळेपण का जाणवणार नाही? शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यानं काम सुरू केलं. त्याची स्वत:ची विश्वासार्हताच मुळात मोठी! आज माणसं मुख्यमंत्री निधीला पैसे देत नाहीत तर नाना व मकरंदकडे मदतीचे पैसे देताहेत. नानाला यातून प्रसिद्धी नकोय. त्याच्या सहकाऱ्यांनाही ती नकोय. हा अकरा कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रापुढचा प्रश्न आहे. प्रत्येकानं तो आपला प्रश्न मानला पाहिजे. निदान तशी जाणीव तरी आपण ठेऊ शकतो. या क्षणी इतकंच म्हणता येईल, 'नाना, तू माणूस विश्वासार्ह आहेस व महाराष्ट्र नेहमीच तुझ्या सोबत आहे.'

**■ महेश मांगले**
संपर्क: ९८२२०७०७८५

# योगीराज



**खरा** मराठी माणूस कोणता?...

तर ज्याच्या ह्रदयात गोरगरीबांविषयी कनवाळा आहे, अन्याय-असत्याविषयी चीड आहे, व्यापक अंगाचे पसायदान जो जगतो तो खरा मराठी माणूस!

सध्या महाराष्ट्र दुष्काळात होरपळतोय. मराठवाडा, विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू आहेत. पाण्याअभावी जनावरे, माणसे मरत आहेत. अशा बिकट परिस्थितीत लोकांचा बोलघेवड्या सरकारवरचा विश्वास उडत चाललेला असताना नाना पाटेकर नावाचा जिंदादिल अभिनेता त्यांचे अश्रू पुसण्यासाठी पुढे आला. या वेदना पाहून त्याचे ह्रदय पिळवटून निघाले. त्याच्यातला मराठी माणूस जागा झाला आणि त्याने दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक पाऊल पुढे टाकले.

शेतकऱ्यांना शक्य तेवढी थेट आर्थिक मदत करण्याचा निश्चय नाना पाटेकर यांनी केला आणि त्यादृष्टिने काम सुरू केले. शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनांची जाणीव असलेल्या मराठवाड्यातल्याच मकरंद अनासपुरे यांना त्यांनी ही मदत गरजूपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी सोपवली. हे करताना कुठेही गाजावाजा करायचा नाही, अशी अटही घातली. मात्र मकरंद मराठवाड्यातलेच! त्यांनी सांगितले, ''नाना, तुम्ही सोबत असाल तरच हे काम मी करू शकेल.'' त्यानंतर नाना आणि मकरंद यांच्या नावाची आद्याक्षरे घेऊन 'नाम' या संस्थेची स्थापना झाली. शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी या अभिनेत्यांनी पुढाकार घेऊन हेच खरे नेते आहेत, हे कृतिशीलतेतून सिद्ध केले.

नामची ही मदत म्हणजे तात्पुरती मलमपट्टी आहे, असे काहीजण सांगत आहेत. त्यात तथ्य असेलही! मात्र हे एक क्रांतीकारी पाऊल आहे. उपेक्षित शेतकऱ्यांचा आत्मविश्वास, त्यांची जगण्याची उमेद वाढवणारे या संस्थेचे कार्य आहे. समाजातील सुह्रदयी लोक या उपक्रमास हातभार लावण्यासाठी पुढे सरसावत आहेत. दळभद्री सरकार त्यांच्या पैशाचा विनीयोग सुयोग्यरित्या करणार नाही, असे वाटल्याने अनेकजण उस्त्फूर्तपणे नाना-मकरंदच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहत आहेत. सढळ हाताने दुष्काळग्रस्तांना मदत करत आहेत. आपला एक भाऊ अडचणीत असेल तर आम्ही त्याच्या पाठिशी आहोत हे या माध्यमातून सांगत आहेत. माणुसकीचे हे नाते जोपासल्याने आपल्या संस्कृतीचे दर्शन यातून घडत आहे. सरकारने दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस हातभार लावावा, असे आवाहन केले होते. त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मात्र नामला सहाय्यता निधी देण्यासाठी लोकांची चढाओढ सुरू आहे. कारण यात नानासारख्या अस्सल आणि मराठमोळ्या माणसावरचा विश्वास आहे. तो काही चुकीचे करणार नाही, आपली मदत गरजूपर्यंत नक्की पोहोचेल या विश्वासाने तो पुढे सरसावला आहे.

नाना पाटेकर यांच्यासारख्याच अस्सल मराठमोळ्या माणसांची यादी करायची ठरवली तर त्यात एका नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. बाणेर येथील ज्ञानेश्वरभाऊ तापकीर. हा माणूस काही फार मोठा जहागिरदार नाही. राज्यातला एखादा बडा उद्योजक नाही. काळ्या पैशाचा धनी नाही. मात्र त्याच्यात नेकी आहे. काहीतरी चांगले करण्याची तळमळ आहे. गोरगरीबांच्या अश्रूने हा माणूस गलबलून जातो. त्यांना मदत तर करतोच पण तो माणूस स्वतःच्या पायावर उभा राहिल यासाठी प्रयत्नशील राहतो. त्यांच्या या जिंदादिलीची अनेक उदाहरणे अनेकांनी जवळून पाहिली आहेत, अनुभवली आहेत.

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील कर्मचारी असलेल्या तापकीरभाऊंनी उद्योगाची कास धरली. स्वतःला समाजसेवेला वाहून घेतले. बाणेर-बालेवाडीसारख्या विकसित भागाचे पहिले नगरसेवक होण्याचा मान त्यांना मिळाला.

संपादकीय
घनश्याम पाटील ७०५७ २९२ ०९२

सामान्य माणसाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांनी पतसंस्थेची स्थापना केली. गगनगिरी महाराजांच्या हस्ते या संस्थेची सुरूवात झाली. ते पावित्र्य, तो विश्वास त्यांनी जपला आणि अनेकांच्या आयुष्यात नंदनवन फुलले. या संस्थेची आजची वार्षिक उलाढाल ३५० कोटीच्या पुढे गेली आहे. 'संपत्ती, संस्कृती संवर्धनारी संस्था' हे मूलतत्त्व घेऊन त्यांची वाटचाल सुरू आहे. संपत्तीबरोबरच सहकार क्षेत्रात संस्कृतीचे जतन करणाऱ्या अशा संस्था दुर्मीळ आहेत.

सामाजिक बांधिलकीच्या नात्याने ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांच्या पुढाकाराने 'योगीराज'च्या वतीने अनेक उपक्रम राबवले जातात. त्यांनी बाणेर उपनगरीय साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले. जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धा घेतल्या. पतसंस्थेच्या माध्यमातून दरवर्षी स्थानिक ज्येष्ठ नागरिक संघांना मानधन देण्याचा आदर्श उपक्रम सुरू केला. गोरगरीबांच्या मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मदत करणारी ही पतसंस्था पाहून कुणालाही अचंबा वाटेल. संगीत तुलसी रामायणाचे आयोजन, अनाथ आश्रमांना देणगी, दरवर्षी रक्तदान आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन हे उपक्रम तर सुरूच असतात.

ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांनी 'योगीराज भूषण' पुरस्कराची सुरूवात केली. २०१२ साली सागरमाथा संस्थेतील सदस्यांनी कर्ज काढून एव्हरेस्ट मोहीम सर केल्याबद्दल या संस्थेला हा पुरस्कार देण्यात आला. २०१३ साली कु. राही सरनौबत हीने विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल तिला हा पुरस्कार देण्यात आला. मागच्या वर्षी २०१४ सालचा 'योगीराज भूषण' पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश आणि मंदाताई आमटे यांना देण्यात आला. आमटे दाम्पत्यांना केवळ एक लाख रूपयांचा पुरस्कार देऊन भागणार नाही, त्यांचे कार्य विराट आहे हे ध्यानात आल्याने 'योगीराज'च्या सर्व संचालकांनी त्यांना तब्बल चौदा लाख रूपये दिले. भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या सोहळ्यास उपस्थित होत्या. प्रकाश आमटे यांच्यासारख्या लोकांमुळे देश सुरळीत चालू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले होते. भारताच्या राष्ट्रपती पदावरील व्यक्ती एखाद्या पतसंस्थेच्या कार्यक्रमास येण्याचे हे उदाहरण दुर्मीळ आहे. ही केवळ आणि केवळ ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांची पुण्याई आहे.

यावर्षीचा हा पुरस्कार नाम संस्थेचे काम तळमळीने पुढे नेणाऱ्या मकरंद अनासपुरे यांना देण्यात येणार आहे. संस्थेचे एक लाख रूपये या पुरस्कारासाठी देण्यात येणार असले तरी त्यासोबत आणखी दहा-बारा लाख रूपये या संचालकांनी द्यायचा निश्चय केला आहे. नाना पाटेकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी सतत संघर्ष उभारणारे खासदार राजू शेट्टी, खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत नामला दुष्काळग्रस्तांसाठी मदत निधी देण्यात येणार आहे.

योगीराजचे संचालक कधीही मानधन घेत नाहीत. ते त्यांचे मानधन सामाजिक कार्यासाठी देतात. या सर्व संचालकांनी हा आदर्श जपत मागच्या पाच वर्षाचे मानधन नामला देण्याचा निर्णय एकमताने घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाला पाठिंबा म्हणून योगीराजच्या सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचा पंधरा दिवसांचा पगार नामला देणार असल्याचे सांगितले आहे. 'योगीराज'च्या पुढाकारातून नामला मदत करणार असल्याचे कळताच मदतीचा ओघ वाढला आहे. श्रीराम पतसंस्थेने यासाठी तब्बल एक लाख पाच हजार रूपये देणार असल्याचे सांगितले आहे. दत्तात्रय मुरकुटे, झुंबरलाल मुरकुटे, तुषार कामठे, कुलजित टोक्स, तुषार देशमुख, साई सुवर्णयुग गणेश मंडळ, डॉ. कोटबागी, संस्थेचे उपाध्यक्ष खंडुजी मांडेकर, पॉवर विन एनर्जी सोल्युशन तसेच या परिसरातील अनेक गणेश मंडळ, नागरिक आणि संस्थांनी पुढाकार घेऊन दुष्काळग्रस्तांना मदत करण्यात हातभार लावला आहे. नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांच्यासारख्या सत्पुरूषांवरील विश्वास आणि ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांचा पुढाकार यामुळे पुण्याने मराठवाड्याच्या हाकेला आवाज दिला आहे.

नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे ही मंडळी स्वतःचे काम सांभाळून सामाजिक बांधीलकीच्या नात्याने दुष्काळग्रस्तांसाठी पुढाकार घेत आहेत. त्यांचे हात बळकट करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. योगीराजसारख्या संस्थांनी त्यासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. आपणही मागे राहू नकात. विधायक कार्यासाठी सर्वांनी संघटीत व्हायला हवे. उद्याच्या उज्ज्वल भारताचे भवितव्य तुमच्या या छोट्याशा कृतीवर अवलंबून आहे...



बाणेर उपनगरीय साहित्य संमेलनात अभिनेते मकरंद अनासपुरे यांचा सत्कार करताना.


२०१४ सालचा योगीराज भूषण पुरस्कार सौ.मंदाताई आणि प्रकाश आमटे यांना प्रदान करताना.

# माणुसकीचा झरा

*काही* माणसं अलवारपणे आयुष्यात येतात. काहींना पाहिल्यावर प्रथम भेटीतच आनंद वाटतो. त्यांच्याशी मैत्रीचा हात पुढे करावासा वाटतो. एका सकारात्मक ऊर्जेची जाणीव त्यांच्या सानिध्यात होते आणि स्नेहाचे धागे नकळत गुंफले जातात. ती व्यक्ती जीवनाचा एक अविभाज्य भाग बनून जाते. आपल्या सुख-दु:खात त्यांचा आधार वाटतो. संकटाच्या वेळी त्यांचे मार्गदर्शन मिळते आणि एक आधारवड आपल्यासाठी निर्माण झालेला असतो. अनेकांसाठीचा असाच एक आधारवड म्हणजे 'चपराक' परिवाराचे सदस्य आणि सल्लागार, आमचे सर्वांचे लाडके भाऊ म्हणजेच 'योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेचे' संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वरभाऊ तापकीर.

तापकीरभाऊंची व माझी ओळख झाली 'अक्षरभारती'च्या साहित्य संमेलनाच्यावेळी. पाषाण, औंध, बाणेर, बालेवाडी या विकसित होणाऱ्या पुण्याच्या उपनगरामध्ये साहित्यिक उपक्रम व्हावेत म्हणून काही समविचारी लोकांनी एकत्र येऊन ही संकल्पना मांडली. प्रथमत: आम्ही साहित्यिकांचीच विचारधारा असलेल्या या संस्थेमध्ये या भागातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. मग त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने या भागात साहित्यिक उत्सव साजरा झाला, पण या उपक्रमाचे सातत्य टिकवले तापकीरभाऊंनी.

त्यावेळी बाणेर-बालेवाडी हा भाग अविकसित होता. बालेवाडीच काय पण बाणेर गावदेखील खूप लांब वाटायचे. बालेवाडीतील छत्रपती शिवाजी स्टेडीअममुळे पुणे विद्यापीठ ते बालेवाडी रस्ता मात्र खूप छान झाला होता. तरीही त्यावेळी हा परिसर अविकसित वाटायचा. अक्षरश: सातशे रूपये स्क्वेअर फुटाने फ्लॅटचे रेट असताना देखील तेथे वास्तू घेण्यास मन धजवत नव्हते. त्याचवेळी पुणे महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या एका कार्यक्षम कर्मचाऱ्याने आपल्या गोड वाणीने, निस्पृह कार्यशैलीने आणि प्रामाणिकपणे लोकांची कामे त्वरीत करून देऊन जनमाणसाच्या मनात आपुलकीचे, जिव्हाळ्याचे स्थान मिळवले आणि ती व्यक्ती चक्क 'नगरसेवक' म्हणून निवडून आली. ती व्यक्ती होती ज्ञानेश्वरभाऊ तापकीर! स्वच्छ, पारदर्शक कार्य, त्यांनी घेतलेल्या अथवा जनतेने त्यांना त्यांच्या कार्यकालात सोपवलेल्या जबाबदारीची चोख अंमलबजावणी करण्याची त्यांची हातोटी, सरकारी कर्मचारी असल्याचा कोणताच तोरा न मिरवता त्यांनी लोकांसाठी केलेले काम, तेही आनंदाने, गोड बोलून. म्हणूनच लोकांनीही त्यांच्यावर विश्वास दाखवून पुणे महानगरपालिकेच्या नगरसेवक पदाची धुरा त्यांच्यावर सोपवली होती. हीच त्यांच्या त्या कार्याला जनमाणसाने दिलेली पसंतीची पावती होती. पाहता पाहता बाणेर-बालेवाडीचा कायापालट झाला. पूर्वी तेथील रहिवासी त्यांना हव्या असणाऱ्या मुलभूत गरजा, रस्ता, वीज, पाणी यासाठी तरसायचे. त्यांच्या सर्व गरजा लक्षात घेऊन प्रथम त्यावरच लक्ष केंद्रीत करून भाऊंनी तो प्रश्न सोडवला. त्यांच्या संपर्क कार्यालयात त्यावेळी आणि आजही सामान्य माणसाला प्रवेश मिळतो. नागरिकांचे म्हणणे, तक्रारी ते त्याहीवेळी सहानुभूतीपूर्वक ऐकून घ्यायचे. आवाक्यातील कामे त्वरीत करून मोकळे व्हायचे. त्यांनी कोणत्याही कामात जाणीवपूर्वक दिरंगाई केलेली कधीच दिसली नाही. त्यांच्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात त्यांनी बाणेर बालेवाडी वासियांचे अनेक प्रश्न सोडविले. मग तो पाण्याचा प्रश्न असो, रामनदीला आलेल्या पुरामुळे विस्कळीत झालेल्या जनजीवनाचा प्रश्न असो अथवा तेथील नागरिकांचा एखादा वैयक्तिक प्रश्न असो. भाऊ त्वरीत त्या प्रश्नांची दखल घेऊन कामाला लागायचे.

म्हणतात ना, कितीही दुर्लक्ष केले तरी फुलाचा सुगंध पसरतोच. तसाच भाऊंच्या कार्याचा सुगंध या परिसरात पसरत राहिला आणि भाऊ एक आदर्श, आवडते व्यक्तिमत्त्व म्हणून ज्ञात झाले. भाऊंच्या सर्व कार्यकालाचा, जीवन प्रवासाचा आढावा मी माझ्या मागील लेखात घेतला आहे पण भाऊंनी हा यशाचा टप्पा कसा गाठला? त्यांच्यात असे कोणते गुणवैशिष्ट्य आहेत की त्यांच्याकडे लोक आकर्षित होतात! त्यांना आपले आदर्श मानतात, त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात याचा सर्वंकष समावेश या लेखात घेणार आहे.


नुकतीच भाऊंनी एक कंपनी विकत घेतली आहे. काही अडचणीत असलेल्या नवीन उद्योजकांना आपल्या पतपेढीच्या सहाय्याने कर्ज देऊन ते गप्प बसले नाहीत तर तो उद्योग चांगला चालावा, आपण दिलेल्या पैशाचा योग्य वापर होऊन व्यवसायवृद्धी व्हावी म्हणून भाऊंनी मार्गदर्शकाची भूमिका घेतली होती. त्या उद्योगाची कार्यकारी संचालकाची जबाबदारीच त्या तरूणांनी भाऊंवर टाकली. भाऊंना त्यांचा तो गोड आग्रह अमान्य करता आला नाही. यामागे काय कारण होतं? की त्या तरूणांनी एवढा विश्वास भाऊंवर दाखवावा? त्यांच्या अनुभवाचा त्यांना लाभ घ्यावासा वाटावा? तर भाऊंचे निस्पृह व्यक्तिमत्त्व! 'समोरच्याचे चांगले व्हावे' ही आंतरिक तळमळ आणि त्यांचा 'सहकार' या तत्त्वाला साजेसा असणारा लाघवी स्वभाव! त्यावेळी शुभेच्छा देताना मी भाऊंना म्हटलं होतं, ''तुम्ही चारही वर्णांचे प्रतिनिधीत्व करता. तुमच्यात धडाडी आहे, धाडस आहे, दानशूरता आहे, मनाचा मोठेपणा आहे म्हणजेच तुम्ही खरे क्षत्रिय शोभता. तुमच्या वाणीत मिठास आहे, तुम्ही उद्योगशील आहात सतत कार्यमग्न असता व तुमचे वाणिज्य क्षेत्रातील ज्ञान अगाध आहे. म्हणून तुम्ही वैश्य वर्णाचे प्रतिनिधी आहात हे जाणवते; तुमचा पिंड कष्टकऱ्याचा आहे. तुम्ही कसल्याही कष्टाची तमा बाळगत नाही, प्रयत्न सोडत नाही तर नवनवे आविष्कार घडवित असता. तुम्ही खरे कलाकार व शिल्पकार आहात म्हणून तुम्ही चारही वर्णात श्रेष्ठ शुद्र वर्णाचेदेखील प्रतिनिधीत्व करता आणि म्हणूनच तुम्ही यशस्वी आहात. हेच तुमच्या यशाचे, सफलतेचे गमक आहे.

भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा व गौरवांकित पैलू म्हणजे त्यांना असणारे सामाजिक भान. त्यांची समाजाप्रती असलेली बांधिलकी! याच सामाजिक जाणिवेच्या माध्यमातून भाऊंनी अनेकविध सामाजिक उपक्रम, गरिबांना, गरजूंना सहाय्य केले आहे. कला, क्रीडा, राजकीय, सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील लोकांना सहाय्य करून त्यांचा गौरवही केला आहे. समाजात चांगले काम करणाऱ्यांची दखल घेऊन त्यांना गौरविले आहे. त्यांचा कामासाठी त्यांना सर्वतोपरी आर्थिक सहाय्य केले आहे. भाऊंची पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा ही काही विवादास्पद विषयांनी रंगत नाही तर तेथे असतो भाऊंनी वर्षभर केलेल्या अनेक आदर्श कार्याचा गौरव, विविध क्षेत्रातील लोकांचा केलेला मानाचा उत्सव आणि सभेच्या शेवटी हातचे काहीच राखून न ठेवता वर्षभरात व्यवसायाच्या माध्यमातून कमावलेल्या नफ्याची जनकल्याणासाठी भाऊंनी केलेली उस्त्फूर्त वाटणी. जे परमेश्वराने भाऊंना भरभरून दिले ते केवळ माझे नसून त्याचा उपयोग आपल्या बांधवांना व्हावा अशी भाऊंची भूमिका खरोखरीच प्रशंसनीय आहे. खरेतर भाऊंचा पिंड कर्मचाऱ्याचा, नंतर ते गेले राजकारणात पण राजकारणातील कोणतेच वाईट गुण न घेता ते आजही एक प्रामाणिक कर्मचारी म्हणूनच कार्यरत आहेत. यालाच म्हणतात सच्चा समाजसेवक.

त्याचप्रमाणे भाऊ जी मदत करतात ती त्या गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचवतात ही आणखी एक खासीयत! म्हणून भाऊंचे दान सत्पात्रीच जाते! मग ते हेमलकसासाठी असो वा नाना-मकरंदच्या 'नाम'साठी असो. योग्य व्यक्तिला, योग्य ठिकाणी, योग्य प्रयोजनासाठीच त्या मदतीचा विनियोग होतो.

असे हे बहुआयामी भाऊ आमच्या 'चपराक'चे सल्लागार, प्रत्येकवेळी मदतीला धावून येणारे, सहकाराचा हात पुढे करणारे, नाते दृढ करण्यासाठी जीभेवरची मिठास जपणारे, मनाने अतिशुद्ध, सुचिर्भूत, एक आदर्श, अनुकरणीय असं व्यक्तित्व! त्यांच्या यापुढील सर्व कार्यासाठी 'चपराक' परिवारातर्फे त्यांना असंख्य शुभेच्छा!

**■ सौ. चंद्रलेखा बेलसरे**
संपर्क: ९८५०८ ९५०५१



# आमचे प्रेरणास्थान ज्ञानेश्वरभाऊ तापकीर

*१९९६ साली* बारावीची परीक्षा झाल्यानंतर मी मराठवाड्यातल्या अंबेजोगाईहून पुण्यात आलो. घरची परिस्थिती बेताची असल्याने या विद्येच्या माहेरघरात काम करून शिक्षण घ्यायचा मानस होता. तो एप्रिल महिन्याचा शेवटचा आठवडा. पुण्यात राहणारा माझा भाऊ सोबतीला होता. नोकरीसाठी वनवन सुरू होती. जवळ पैसेही नव्हते. अशातच योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना होणार असल्याची बातमी वाचली. त्यांना एक माणूस संस्थेच्या कामासाठी हवा होता. नशीब आजमावून पाहावे म्हणून मी जायचे ठरवले. भावाने दुचाकीवर मला पतसंस्थेच्या इमारतीजवळ सोडले आणि मुलाखत झाल्यावर त्याला पुन्हा फोन करायला सांगितला.

तो दिवस होता ३० एप्रिल १९९६ चा. वेळ सकाळी साडे नऊ-दहाची. चहा-नाश्ता काहीही न करता मी संस्थेत आलेलो. तासाभरात मुलाखत होईल असे वाटले होते. एका जागेसाठी पन्नास एक मुले आणि तीस एक मुली आलेल्या. सुरूवातीला मुलींच्या मुलाखती झाल्या. त्यानंतर जेवणाची सुटी झाली. आता मुलांच्या मुलाखती सुरू होणार होत्या. त्यात कुणी बी. कॉम. झालेले होते तर कुणाचा बँकेच्या, पतसंस्थेच्या कामाचा अनुभव दांडगा होता. माझे मात्र फक्त बारावी झालेली. त्यामुळे अनेकजण मला विचारत होते, ''तू कशाला थांबलास?'' मलाही ते पटत होते. एकच जागा असल्याने आपल्याला संधी मिळणं शक्यच नाही याची खात्री होती. मात्र आयुष्यातील पहिलीच मुलाखत असल्याने किमान मुलाखत हा प्रकार असतो तरी काय हे पाहावे असे मला वाटले. दुपारी जेवणासाठी म्हणून सर्वजन बाहेर पडले. तासाभराची सुटी होती ती. मीही संस्थेच्या इमारतीखाली आलो. तिथे वडापावचे एक दुकान होते. त्यावेळी तीन रूपयाला वडापाव होता. माझ्या खीशात मात्र दोनच रूपये असल्याने मी पाव न घेता फक्त एक वडा घेतला. तो खाल्ला आणि परत संस्थेत जाऊन बसलो. त्यातही मुलाखतीसाठी माझा नंबर सर्वात शेवटी आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर स्वत: मुलाखती घेत होते. मला त्यांनी काही प्रश्न विचारले. मी त्याची समाधानकारक उत्तरे दिली. त्यांनी विचारले, ''तुझा आवाज एवढा लहान का येतोय? जरा खणखणीतपणे बोल की!'' मी भाबडेपणाने त्यांना सांगितले, ''एक वडा खाऊन सकाळपासून बसलोय. भुकेने बोलवत नाही.'' माझी ती परिस्थिती ऐकून त्यांनी पगाराची अपेक्षा विचारली. ''तुम्ही द्याल तो'' मी सांगितले. ते पुन्हा म्हणाले, ''तरीही तुझी अपेक्षा सांग.'' मी म्हणालो, ''पुण्यात राहून मला माझे शिक्षण पूर्ण करायचे आहे. घरच्यांच्या अपेक्षा पूर्ण करायच्यात. जेवणापुरते महिने तीनशे रूपये दिलेत तरी पुरतील.'' झाले! योगीराजमध्ये माझी नेमणूक झाली. २६ मे १९९६ ला पतसंस्थेची सुरूवात झाली आणि या संस्थेचा स्थापनेपासूनचा सदस्य होण्याचे भाग्य मला लाभले.

त्यानंतर कधी मागे वळून बघीतलेच नाही. ज्ञानेश्वरभाऊंचे भरभरून प्रेम लागले. माझे शिक्षण पूर्ण झाले. इथेच मी व्यवस्थापक झालो. अन्न, वस्त्र आणि निवारा या तीनही मुलभूत गरजा योगीराजने पूर्ण केल्या. संस्थेचे सर्वप्रकारचे काम बघितल्याने सहकार क्षेत्राचा अनुभव आला. माझ्या घडण्याचे हे विद्यापीठच आहे. भाऊंनी मला कधीही आणि काहीही कमी पडू दिले नाही. ते अनेक क्षेत्रात कार्यरत आहेत. मात्र सर्व व्यसनापासून ते दूर आहेत. त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. अडल्या-नडलेल्यांना ते उदारपणे मदत करतात. हे सर्व जवळून पाहता आले, शिकता आले. त्यामुळेच आईवडील आणि देवानंतर माझ्या आयुष्यात त्यांचे स्थान मोलाचे आणि श्रद्धेचे आहे.

भाऊंनी माझ्यावर विश्वास ठेवल्याने माझ्या आयुष्याला दिशा मिळाली. आमचा योगीराज परिवार त्यांच्या खंबीर नेतृत्वाखाली कार्यरत आहे. प. पू. गगनगिरी महाराजांच्या आशीर्वादाने, त्यांच्याच उपस्थितीत योगीराजची स्थापना झाली. त्यामुळेच या संस्थेचा वेलू गगनावरी गेला आहे. तीनशे करोडहून अधिकचा टप्पा योगीराजने गाठला आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत अनेक उपक्रम योगीराजच्या माध्यमातून सातत्याने सुरूच असतात. त्यामागे भाऊंची दूरदृष्टी आणि सर्व संचालक आणि कर्मचाऱ्यांच्या पाठीवर त्यांची असलेली कौतुकाची थाप आहे. त्यांच्या प्रेरणेमुळेच आजचे हे चांगले दिवस आले आहेत. योगीराजचा एक ठेवीदार दुबईत तर एक कर्जदार सिंगापूरला आहे. अपघातात डोक्याची कवटी फुटल्यानंतर कसलीही ओळख नसताना त्या रुग्णाला दवाखान्यात जाऊन आधी कर्जाचे पैसे देणारे आणि त्याचे प्राण वाचवणारे भाऊ सहकार क्षेत्रासाठी आदर्श ठरावेत.

भाऊ, तुमच्या या तळमळीमुळे, दिलदारपणामुळे आणि मनाच्या मोठेपणामुळेच आमचे भवितव्य उज्ज्वल आहे!

**■ दत्तात्रय गंगणे**
संपर्क: ९४२२३ ४५६९४

# व्रती साहित्यिक : डॉ. मुकुंद दातार

*जानेवारी* २००५ मध्ये, राजकोट येथे एका साहित्य परिषदेकरिता स्नेहल प्रकाशनचे रविंद्र घाटपांडे यांचेसह जाण्याचा योग आला. प्रवासातील गप्पांमध्ये रवीजींनी डॉ. मुकुंद दातारांचा उल्लेख मोठ्या आदराने वारंवार केला. त्यांच्या काही आगामी पुस्तकांसंबंधी सांगितले. योगायोग असा की, निवृत्तीनंतर डॉ. दातार येरवडा-वडगाव शेरी परिसरात वास्तव्यास आले. याच भागात, मी ३५ वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करित असल्यामुळे, डॉ. दातारांची ओळख लगेच झाली. नेहमी होणाऱ्या भेटीतून मला मार्गदर्शन तर लाभायचेच, त्याचबरोबर त्यांच्या लेखन वैशिष्ट्यांची, संशोधक वृत्तीचीही, ओळख होऊ लागली.

**आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासी।**
**बोलिले जे ऋषी। साचभावे वर्तावया।।**

श्री तुकोबारायांनी म्हटल्याप्रमाणे डॉ. दातारांच्या ग्रंथामध्ये याच भूमिकेचा प्रत्यय येतो. महाविद्यालयीन जीवनातच त्यांचा 'लेखक' पिंड घडू लागला होता. कॉलेजातलं 'वाङ्मय मंठळ' चालवताना, ज्येष्ठ लेखक पु. भा. भाव्यांची भेट प्ररणादायीच ठरली. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे, लेखनाचा उत्साह वाढला, केशवसुतांच्या कवितांचा मागोवा घेणारे आस्वादक समीक्षेचे



पुस्तक, त्याची प्रचिती देते. कवी मन आणि संवेदनशील स्वभावामुळे कविता लेखनाच्या उर्मीबरोबरच संतसाहित्याचं भांडारही त्यांना खुणावू लागले. भक्तीभाव, मानवतेची शिकवण आणि एकूणच संतवाङ्मयातील शब्दवैभवाकडे डॉ. दातार अधिकच आकृष्ट झाले. त्यांचा स्थायीभाव चिंतकाचा, संशोधकाचा जसा आहे तसाच तो सामाजिक तळमळीचाही आहे. म्हणूनच 'स्वान्त:सुखाय' काही लिहिणं त्यांना रूचलं नाही, मन अन्यत्र रमलं नाही! संत साहित्याच्या पालखीचा वारकरी होणं हेच त्यांनी आपलं व्रत मानलं. कष्टपूर्वक ते आजवर गोपासलंय! एकदा साहित्य प्रवासाची दिशा नक्की झाल्यावर माघारा वळलेच नाहीत.

संत-पंचकांनी आणि साऱ्याच संत मांदियाळीने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. आपले सामाजिक जीवन शुद्ध असावे, भेदाभेद नष्ट व्हावेत, माणुसकी, भुतदया वाढीस लागावी इत्यादी जी शिकवण संतांनी दिली आहे, त्याचे वारंवार स्मरण करण्याचा डॉ. दातार आपल्या साहित्यातून प्रयत्न करताना दिसतात. वर्तमान काळात अविश्वासाचे, अश्रद्धेचे जे वातावरण अनुभवास येते ते पाहून डॉ. दातारांसारखा श्रद्धाळू, संवेदनशील लेखक आणि समाजाप्रती प्रेम असलेला, एक मनस्वी 'स्वयंसेवक' स्वस्थ कसा बसेल? वारकरी संप्रदायाचे आध्यात्मिक लोकशाहीचे विचारधन आणि रामदास स्वामींनी शिकवलेला आचारधर्म सांप्रतच्या समाज जीवनाला वळण देऊ शकेल या विश्वासाने त्यांनी आपली लेखणी लिहिती ठेवली आहे. 'वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी' आणि 'वारकरी विश्व आणि समथे रामदास' हे त्यांचे दोन ग्रंथ याची साक्ष देतात. वारकरी संप्रदायाची संतांची 'एकदेवत्वाची' कल्पना, परोपकार, क्षमाशिलता या दैवी गुणांची जोपासना करणारा विचार डॉ. दातारांनी प्रभावीपणे या ग्रंथात प्रतिपादन केला आहे. आपल्या मराठी माणसांना वाद घालण्याची भारी हौस आहे म्हणतात. तो वाद कसा निरर्थक आहे, गैरसमजुती काय आहेत? याची तर्कशुद्ध मांडणी, संशोधनपूर्वक, सोदाहरणाने पटवून दिलेली आहे. दोहोतील समत्व, अद्वैत कसे आहे ते अनेक पुराव्यांनी 'अभ्यासेन' या ग्रंथामध्ये प्रगटले आहे. डॉ. दातारांचे हे ऋण आपण मानले पाहिजे. त्यांचे सारे परिश्रम, तळमळ आहे ती समाज जोडण्याची, समाज एकसंघ-समरस निर्मितीची! आणि हे सारे विवेचन करताना डॉ. दातार आपली विनयशीलता ढळू देत नाहीत.

असा हा व्यासंगी लेखक 'कार्यकर्त्या'च्या भूमिकेतही सक्षमपणे वावरताना दिसतो. 'गीताधर्म मंडळ' या संस्थेचे अध्यक्षपद त्यांच्याकडे आहे. हे पद केवळ शोभेचे नाही, तर तन-मन-धन पूर्वक त्यांनी स्वत:ला त्यात झोकून दिले आहे. संस्थेचा लौकिक वाढावा, ती संस्था अधिक लोकाभिमुख व्हावी म्हणून ते आपल्या सुविद्य पत्नीसह कार्यरत आहेत. हजारो गीता पाठकांचे एकत्रित गीता पठण किंवा शहराच्या कानाकोपऱ्यात गीतासंस्था वर्ग सुरू करणे असो त्यांचे भरीव योगदान तेथे दिसतेच. उपक्रम योजणे, पार पाडणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. 'स्नेहांजली पुरस्कारा'बद्दल त्यांचे अभिनंदन व भावी लेखन कार्यास शुभेच्छा!

■ **प्रदीप नाईक**, पुणे

# झलक - 'साहित्य चपराक' दिवाळी विशेषांक २०१५

**पूर्वनोंदणीसाठी संपर्क**
**७०५७२ ९२०९२**

### तीन सारांश कथा

कथा हा अतिशय लवचिक असा वाङमयप्रकार आहे. संस्कृतिच्या प्रारंभापासून कविता आणि कथा लिहिल्या जातात. पुढे नाटक आले. म्हणजे साहित्याचे हे मूळ अविष्कार रूपे होत. कथा ही लवचिक असल्यामुळे ती असंख्य रुपात व्यक्त झालेली आहे. होऊ शकते. लघुत्तम कथा, लघुकथा, गोष्ट, कथा, दीर्घकथा, धक्कांतिका अशा विविध रुपात कथा लिहिली गेली. कमीत कमी अवकाशात खूप काही सूचित करण्याचे सामर्थ्य कथा या वाङमय प्रकारात असते. शिवाय काही अनुभवच असे असतात की, कथेशिवाय ते इतरत्र व्यक्त होऊच शकत नाहीत. एक प्रकारची अपरिहार्यताच तेथे असते. 'चपराक दिवाळी अंक २०१५' मध्ये 'सारांश कथा' हा एक प्रयोग केला आहे डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी! कमीत कमी अवकाशात अधिकाधिक वास्तव गोळीबंदपणे प्रकट करण्याचा हा प्रयत्न आहे.

### चौथं पोट (व्यंग्यकथा)ल


आपल्या राज्यकर्त्यांना खा खा चा भस्म्या रोग झालाय. यांनी कितीही खाल्ले तरी यांची भूक काही शमत नाही. यांनी जमिनी पचवल्या. डोंगर गिळले. योजना हडप केल्या तरी यांचे पोट भरत नाही. निसर्गाने दिलेल्या पोटाला असे काय आणि किती लागणार? पण यांनी हे सारे पचवण्यासाठी नवनवी पोटे शिवून घेतली. या व्यवस्थेचे डोळसपणे चित्रण करणारे सुप्रसिद्ध लेखक, नामवंत पत्रकार ह. मो. मराठे यांनी हाच धागा पकडून एक खास व्यंग्यकथा लिहिली आहे 'साहित्य चपराक'च्या दिवाळी अंकासाठी. आपल्या निर्ढावलेल्या आणि भ्रष्ट नेत्यांचा खरा चेहरा दाखवणारी ही कथा यंदाच्या 'चपराक' दिवाळी अंकात अवश्य वाचा.

### मराठवाड्यातील खाद्यसंस्कृती

अश्मयुगीन कालखंडापासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत मानवाच्या जीवनात वेगवेगळे बदल होत गेले. संस्कृती बदलल्या. जीवनमान बदलले. अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन गरजा मात्र कधीच बदलल्या नाहीत. गरजांचे स्वरुप फक्त बदलले. कंदमुळे खाणारा आदिमानव आणि विविध पदार्थ चवीनं खाणारी आजची पिढी या दोन बिंदुच्या मध्ये असलेला भक्कम खाद्यप्रवास निश्चितच रंजक, ज्ञानवर्धक आणि विशेषतः भूकवर्धक आहे.मराठवाड्याच्या संपन्न खाद्य प्रवासाचा आढावा घेतला आहे नांदेड येथील कवयित्री आणि लेखिका ज्योती कदम यांनी. रद्दीवाला आणि बारवालाही संमेलनाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत! सध्या संमेलनाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत जो तो उठतोय व अर्ज भरतोय आणि आपला साहित्याशी कसा संबंध आहे हे सांगतोय. इथून पुढे रद्दीवाले आणि बारवालेही अर्ज भरायला कमी करणार नाहीत. तेही आपला साहित्याशी असलेला संबंध सांगतील. संमेलनाच्या समकालीन वास्तवावर खुसखुशीत भाष्य करणारा प्रा. मिलिंद जोशी यांचा विशेष लेख.

### गोष्ट गोमंतकीय चवीची..

पु. ल. देशपांडे यांनी तुम्हाला कोण व्हायचंय? मुंबईकर, पुणेकर की नागपूरकर?' या लेखात, नागपूरकर होणाऱ्यांना उद्देशून म्हटलंय, नागपुराखेरीज इतर कुठेच खाण्यापिण्याचा शौकच नसतो असा सिद्धान्त उराशी बाळगावा; मात्र पदार्थांचा फार तपशील देऊ नका, नाहीतर एखादा गोवेकर नुसत्या बांगड्याचे वीस प्रकार सांगेल आणि तुम्हाला तुमच्या वडाभाताच्या पुढे जाता येणार नाही, म्हणजे पंचाईत सगळी...'' खरी गोष्ट. गोव्याचा 'मनीस' माशावर जिवापाड प्रेम करतो. गोंयकार हा सुशेगाद! निवांत!!




आनंदानं जगायची आवड असलेला. अथांग सागराच्या किनाऱ्याला विसावलेला हा गोमंतक जात्याच रसिक आहे. मद्य आणि मत्स्य यांचा रसिकतेनं आस्वाद घेणारा आहे.

दै. 'गोमन्तक'चे निवासी संपादक श्रीराम ग. पचिंद्रे यांचा गोमंतकीय चवीची ओळख करून देणारा हा विशेष लेख वाचा 'साहित्य चपराक दिवाळी विशेषांक २०१५' मध्ये!

### अशी ही साताऱ्याची तऱ्हा!

अजिंक्यतारा किल्ल्याच्या कुशीत वसलेलं, प्राचीन, ऐतिहासिक वारसा लाभलेलं, 'सातारा' हे दक्षिण महाराष्ट्रातलं महत्त्वाचं शहर! छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचं तोरण बांधलं ते याच भूमितल्या रायरेश्वरच्या पठारावर! अफझलखानाचा वध छ. शिवरायांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी केला. स्वराज्याच्या सीमा अरबी समुद्रापर्यंत भिडवल्या. त्या ऐतिहासिक घटनेची साक्षीदार असलेली भूमी हीच! साताऱ्याचे लोकजीवन, संस्कृती, इतिहास, राजकारण, वेशभूषा, खाद्य संस्कृती याविषयी अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे ज्येष्ठ पत्रकार वासुदेव कुलकर्णी यांनी.

### ध्येय अमुचे हे ठरले; कार्य दुसरे ना उरले! अर्थात पुरोगामी चळवळीचे मारेकरी!!

लोकसभा निवडणुका संपून आता दीड वर्षाचा कालावधी उलटला आहे आणि त्यात नरेंद्र मोदी यांनी भाजपाचे नेतृत्व करताना काँग्रेसचा ऐतिहासिक पराभव घडवून आणला. नुसता त्या पक्षाचा तो पराभव नव्हता तर स्वातंत्र्य चळवळ व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय क्षितीजावर तळपत असलेल्या नेहरू-गांधी प्रणित तथाकथित सेक्युलर वा पुरोगामी विचारसरणीचा तो दारूण पराभव होता. मात्र इतके होऊनही अजून कोणी त्याचा गंभीरपणे अभ्यास केलेला नाही; किंबहुना त्या निकालांची गंभीर दखलसुद्धा घेतली गेलेली नाही. उलट जुनेपाने संदर्भ देवून अशा पराभवातून काँग्रेस अनेकदा कशी सावरली आहे, त्याचे दाखले देण्याची पळवाट शोधण्यात जाणत्यांनी धन्यता मानलेली आहे. इथे 'जाणते' म्हणजे फक्त काँग्रेस पक्षातले जाणते व अभ्यासू नेते असेच म्हणायचे नाही; तर स्वत:ला राजकीय विश्लेषक वा पुरोगामी विचारांचे समर्थक मानल्या जाणाऱ्या पत्रकार-संपादक व लेखकांचाही त्यामध्ये समावेश आहेच! पण त्याच्याही पलीकडे जे अन्य पुरोगामी पक्ष वा संघटनेशी संबंधित आहेत, त्यांचाही याच जाणत्यांमध्ये समावेश होतो. अशा तथाकथित तमाम पुरोगाम्यांनी मोदींचा विजय केवळ निवडणुकीतला विजय मानून त्याकडे केलेला कानाडोळा त्यांच्या बेफिकीरीचे लक्षण नाही, तर बौद्धिक दिवाळखोरीची साक्ष आहे.

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ 0३0 येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ 00२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक घनश्याम वसंतराव पाटील** (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय: 'चपराक', ६१७, साईकृपा, पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११00२ भ्रमणध्वनी: ७0५७२९२0९२ ई-मेल: info@chaprak.com